# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** हातकणंगले
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0527 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**11/10/2025 05:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/10/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/10/2025
**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/10/2025 **Time (वेळ):** 04:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/10/2025 04:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** हेरले ग्रामपंचायत , हेरले ,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** हातकणंगले
**District(State) (जिल्हा(राज्य)):** कोल्हापुर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेंद्र अशोक सानप

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जि कोल्हापूर ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जि कोल्हापूर ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8208971207

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल सहदेव निंबाळकर | | | 1. हेरले ,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरज जिनगोंडा पाटील | | | 1. हेरले ,हातकणंगले ,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ रूपये त्यात 500 रूपये दराच्या 40 चलनी नोटा, मि.की.स. | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 11/10/2025

मी राजेंद्र अशोक सानप वय 40 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 8208971207 समक्ष हातकणंगले पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 09/10/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयात हजर असताना मला पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांनी 09.00 वाजता त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन कळविले की, तक्रारदार हरी दत्तात्रय चौगुले वय 28 वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा.हेरले ता. हातकणंगले जि.कोल्हापूर यांचेकडे मौजे हेरले ता.हातकणंगले जि.कोल्हापूर या कार्यालयातील शिपाई राहुल निंबाळकर हे लाच मागणी करत असलेबाबत त्यांनी फोनवरून तक्रार सांगितली असुन तुम्ही तात्काळ हेरले, ता. हातकणंगले येथे जावुन तक्रारदार चौगुले यांचे तक्रारीप्रमाणे पुढील कायदेशिर कारवाई करा असा मुखशिल आदेश दिला. त्यावेळी आम्ही लागलीच तक्रारीवर कारवाई करणेसाठी विभागीय सह संचालक उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग या कार्यालयातुन दोन पंच उपलब्ध करून घेतले. मी व तक्रारदार फोनवरून एकमेकांचे संपर्कात होतो. त्यानंतर आम्ही, दोन शासकीय पंच व स्टाफ असे हेरले गावाचे अलीकडे कोल्हापूर सांगली रोडलगत असले हालोडीं गावचे हददीतील बंद असले नायरा पेट्रोल पंप येथे भेटलो. त्यावेळी मी तक्रारदार चौगुले यांना स्टाफ, शासकीय पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार चौगुले यांना त्यांची तक्रार विचारली असता त्यांनी त्यांची थोडक्यात हकिकत सांगितली की, ग्रामपंचायत हेरले ता.हातकणंगले जि.कोल्हापूर या कार्यालयात माझे प्रधानमंत्री घरकुल योजने अंतर्गत माझी आजी गंगुबाई रामचंद्र चौगुले यांचे नावे घरकुल मंजुर झाले होते. माझी आजी दिनांक 10/10/2024 रोजी मयत झालेनंतर सदरचे घरकुल वडील दत्तात्रय रामचंद्र चौगुले नावे वारस म्हणुन नोंद झाले. सदर घरकुलाचे कामासाठी लागणारे कागदपत्रे व इतर कामासाठी मी स्वतः वडील वयस्कर असलेने त्यांचेवतीने पाठपुरावा केलेला आहे. माझे वडीलांचे नावे मंजूर झालेल्या घरकुलाचा पहिला हफ्ता 15,000/- रूपये हा वडील दत्तात्रय चौगुले यांचे बॅक ऑफ इंडीया शाखा रूकडी येथील अकाऊंटला जमा झालेला आहे. त्यानंतरचे घरकुलाचे कामाचे हफ्ते हे प्रलंबित असलेने. सदर प्रलंबित हफ्ते कधी जमा होणार याची विचारणा करणेसाठी मी दिनांक 03/10/2025 रोजी ग्रामपंचयात कार्यालय हेरले ता.हातकणंगले जि.कोल्हापूर येथे गेलो होतो. त्यावेळी ग्रामपंचायत कार्यालय हेरले येथे कार्यालयातील शिपाई राहुल निंबाळकर यांचेकडे मी घरकुलाचे प्रलंबित हफ्ते कधीपर्यंत जमा होतील याची विचारणा केली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, माझे घरकुलाचे प्रलंबित हफ्ते हे हातकणंगले तालुक्याचे वरीष्ठ ऑफीसातुन जावुन मंजुर करून आणतो त्याकरीता वरीष्ठ कार्यालयात देणेसाठी 25,000/- रूपये दयावे लागतील तरच उरलेले हफ्ते जमा होतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना कोणाला पैसे दयावे लागतील असे विचारले असता त्यांनी वरीष्ठ अधिकारी यांची नावे घ्यायची नसतात तुम्ही पैसे दया मी तुमचे कामपुर्ण करून देतो असे म्हणाले. तेव्हा मी शिपाई निंबाळकर यांना काही कमी करा असे विनंती केली असता त्यांनी 25,000/- रूपयेच दयावे लागतील असे स्पष्ट मला सांगितलेने मी शिपाई निंबाळकर यांना सध्या माझेकडे ऐवढे पैसे नाहीत मी पैशांची तयारी करून येतो व आपणास भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलेलो आहे. माझे प्रधानमंत्री घरकुलाचे हफ्ते हातकणंगले तालुक्याचे वरीष्ठ ऑफीसातुन मंजुर करून आणतो त्या करीता तेथील अधिका-यांना देणेसाठी कार्यालयातील शिपाई राहुल निंबाळकर हे माझेकडे मागणी

करीत असलेले 25,000/- रूपये रक्कम ही लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. तरी त्यांचेवर कारवाई करावी म्हणुन तक्रार सांगुन तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी तक्रारदार चौगुले यांनी ते शिपाई निंबाळकर यांना दिनांक 09/10/2025 रोजी 12.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालयात भेटण्यास जाणार असलेचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेवरून तक्रारदार चौगुले यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. चौगुले यांनी सांगितलेली व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार चौगुले व पंच नं.01 हजारे यांचेसह शिपाई निंबाळकर यांना भेटणेसाठी ग्रामपंचायत हेरले येथील कार्यालयात पाठवुन चौगुले यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे शिपाई निंबाळकर हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांनी आताच माहिती घेतली असता शिपाई निबांळकर हे कार्यालयात नसुन उदया येतील असे समजले आहे असे सांगितले. त्यावेळी आम्हा सर्वांचेमते पडताळणी दिनांक 10/10/2025 रोजी करणेचे ठरविले.

दिनांक 10/10/2025 रोजी मी तक्रारदार चौगुले असे संपर्कात होतो आम्ही, पंच व सापळा पथक असे हालोडीं गावचे हददीतील बंद असले नायरा पेट्रोल पंप येथे 12.24 वाजता आलो त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार चौगुले तेथे हजर झाले. त्यावेळी मी तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार चौगुले व पंच नं.01 हजारे यांचेसह शिपाई निबांळकर यांना भेटणेसाठी पाठवुन चौगुले यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे शिपाई निंबाळकर हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन, पडताळणी कारवाईचे अनुषंगाने मी संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे नविन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकॉर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार चौगुले व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षीक दाखविले. त्यानंतर तक्रारदार चौगुले व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केली. त्यानंतर पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकॉर्डर 13.32 वाजता चालु करून, तो तक्रारदार चौगुले यांचे गळयात काळया दो-याच्या साहयाने अडकवुन तक्रारदार चौगुले व पंच नं.1 हजारे यांना शिपाई निंबाळकर यांची भेट घेण्याकरीता, त्यांचे मोटर सायकल क्रमांक एमएच 09 डी.यु.1813 वरून हेरले ग्रामपंचायत कार्यालयात पाठविले. त्यांनतर काहीवेळाने तक्रारदार चौगुले व पंच नं.1 हजारे असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर 13.53 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 हजारे यांना शिपाई निंबाळकर यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी तक्रारदार चौगुले यांचे सोबत हेरले ग्रामपंचायत कार्यालयासमोर गेलो त्यावेळी तक्रारदार चौगुले हे शिपाई निंबाळकर यांना भेटले त्यावेळी तेथे बाजुलाच ग्रामपंचायत कर्मचारी सुरज पाटील हे होते. त्यावेळी चौगुले व निंबाळकर यांचेत तक्रारदार यांचे घरकुलाचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी शिपाई निंबाळकर " आरे मी काय सांगालोय पंचवीस दे जा, पंचवीस दे जा आणि मी तुला त्यातन फायदा करून देतो, तुझ पाच काढुन देतो म्हणुन सांगितल की, तुम्ही वीस म्हणलासा आम्ही पंचवीस म्हणालोय एवढाच फरक हाय, आणि लयच तुला जर वाटत आसल तर तुला काय मनाला वाटतय ते कर आणि विषय संपव आता लय काय हयात आता लांबड लावण्यात काय पॉईट नाही" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार चौगुले "पंचवीस हजार मध्ये कणी, काय तर जरा, तुज्या हेन कर, साहेबाला सांग" असे म्हणाले. त्यावेळी निंबाळकर "मी सांगितल नव्ह, बर दे जा एक दोन दोन हजार रूपये कमी देजा, दोन हजार कमी, बर आता आणि हेज्या व्यतिरिक्त काय कमी करू शकत नाही " असे म्हणाले. त्यावेळी चौगुले "हे बघ वीस हे बघ वीस हजार रूपये करतो" असे म्हणाले. त्यावेळी निंबाळकर "दे जा.. "असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेत पुन्हा तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी चौगुले "वीस हजार रूपये देतो" असे म्हणाले त्यावेळी निंबाळकर "काय तरी कर, तु आणुन दे त्याला, दे नाहीतर तेज्या अकाऊटला मार काय तरी कर, मग त्यो तिकड पुढ पाठवल काय, तुझ कस करशील तस " असे म्हणाले. त्यावेळी चौगुले " चालतय ...कुणाच्या अकाऊटला मारायच " असे म्हणाले. त्यावेळी निंबाळकर "सुरजच्या मार की, सुरजच्या मार नसल तर त्यो नंबर दिल हेनी त्या नंबरला मार काय विषय नाही " असे म्हणाले. त्यावेळी बाजुलाच असलेला सुरज पाटील "साहेब येणार हाय चार पाच वाजता फोटो काढुया" असे म्हणाला. त्यावेळी निंबाळकर सुरज याला " सांगितलय त्येला झालय बोलण" असे म्हणाले. त्यावेळी चौगुले व निंबाळकर यांचेत घरकुल योजनेच्या पैशाचे अनुषंगाने बोलने झाले तसेच निंबाळकर हे चौगुले यांना आजच्या आज पैसे आणुन देण्याचे अनुषंगाने बोलले त्यावेळी तक्रारदार चौगुले यांनी पैसे शिरोली येथे जावुन घेवुन येतो असे सांगुन आम्ही तेथुन निघुन आलो आहे अशी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही तक्रारदार चौगुले यांना शिपाई निंबाळकर यांना भेटण्यास गेले नंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 हजारे यांचे हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

पडताळणी कारवाईमध्ये शिपाई निंबाळकर यांनी तक्रारदार यांना सुरज पाटील याचेकडे पैसे देण्यास सांगितल्याचे

निष्पन्न झाल्याने आम्ही तक्रारदार यांना त्यांचे मो.नं.वरून सुरज पाटील यांचे मो.नं.7385237595 वरती फोन करण्यास सांगितला. त्यावेळी तक्रारदार यांनी सुरज यांचे फोनवर फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही त्यानंतर सुरज पाटील याचा तक्रारदार चौगुले यांना 15.51 वाजता फोन आला त्यावेळी तक्रारदार चौगुले "बर बर सकाळी आलतो राहुल दादाकड ते घरकुल साठी" असे म्हणाले. त्यावेळी सुरज पाटील "हं" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार चौगुले "ते आलाय म्हणला तेन, मग तेच तुमच्याकड तेन वीस हजार रूपये दयायला लावलेला" असे म्हणाले. त्यावेळी सुरज पाटील "दया तेज्याकडच दया, नंतर बघ तेला नंतर हे करा, त्याला फोन करा" असे म्हणुन पैसे राहुल निंबाळकर याच्याकडे देण्याविषयी बोलने झाले. सदरचा फोन कॉल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड केला.

तक्रारदार चौगुले यांच्या वडीलांच्या नावे प्रधानमंत्री घरकुल योजने अंतर्गत घरकुल मंजुर झालेले आहे त्याचे प्रलंबित हफ्ते हातकणंगले येथील वरीष्ठ कार्यालयातुन मंजुर करून देतो त्याकरीता तेथील अधिकारी यांना 25,000/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार चौगुले यांचेकडे शिपाई राहुल निंबाळकर याने 25,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 20,000/- रूपये लाचेची मागणी केली तसेच सुरज जिनगोंडा पाटील, पद- रोजगार सेवक याने शिपाई राहुल निंबाळकर याने मागणी केले लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निषन्न झाल्याने आम्ही शिपाई राहुल निंबाळकर यांचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यानंतर मी तक्रारदार चौगुले यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 40 चलनी नोटा अशी 20,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली. त्यानंतर मी तक्रारदार चौगुले व पंचाना अॅंथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अॅंथ्रासिन लावलेले 20,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर तक्रारदार चौगुले दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या तसेच तक्रारदार चौगुले यांना निंबाळकर याने लाचेची रक्कम स्विकारलेनंतर त्यांचे शर्टच्या गुंडाळलेल्या हाताच्या बाहया खाली सोडुन पुर्वनियोजीत इशारा करणेचा आहे असे सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार चौगुले व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर 16.39 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांचे शर्टचे आतमध्ये काळे दो-याचे साहयाने गळयात अडकवला. (सोबत फिर्यादी जबाब जोडला आहे. )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sharad Shankrrao Memane (I (Inspector)) / POBN84064 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sharad Shankrrao M
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84064